# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर— ४४०००१.

E-mail:ronagpur.dte@gmail.com Web:- rdtenagpur.org.in

दुरध्वनी क्र. २५६५१४३ फॅक्स क्र. ०७१२—२५६१६६३


क्रमांक : तंशिसं/प्राकाना/शैवि२/२०१२/ 1908

दिनांक : 5 JUL 2012

प्रति,

प्राचार्य,

( सर्व पदविका, पदवि, पदव्युत्तर पदवी संस्था )

विषय :— अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ व अंतर्गत नियम व नियमन २०११. शासकीय व निमशासकीय कार्यालयामार्फत अन्न पदार्थाची होत असलेल्या विक्री करीता परवाने घेणेबाबत.

संदर्भ :— संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी /विक्रिपरवाना/२०१२/६५०, दि. ०२.०६.२०१२.
२. अन्न व औषध प्रशासन, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. असुका/विक्री परवाना/KUM250-12 /७, दि. २१ मार्च २०१२.

उपरोक्त विषयाबाबत सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, अन्न व औषध प्रशासन, म.रा. मुंबई यांचे सोबत जोडलेल्या संदर्भाकिंत पत्र क्र. २ मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

(गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.

प्रत :— प्रोग्रामर , हेच कार्यालय यांनी सदर पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करावे.

Contact Numbers :-

A. E. Kerure 09969034272
(Food Safety Officer)
A. S. Rege - 09323343355
(Food Safety Officer)

क्रमांक : असुका/विक्री परवाना/KUM231-12/7
अन्न सुरक्षा आयुक्तालय,
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य.
सर्व्हे क्र. ३४१, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व ), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : 29 मार्च, २०१२.
Fax :- 022 - 26591618
022 - 26591959
Tel :- 022 - 26590548
022 - 26592686.

प्रति,

सर्व मा. अपर मुख्य सचिव/
मा. प्रधान सचिव/ मा.सचिव.

विषय :- अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ व अंतर्गत नियम व नियमन २०११.
शासकीय व निमशासकीय कार्यालयामार्फत अन्न पदार्थाची होत असलेल्या
विक्री करिता परवाने घेणेबाबत.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, विषयांकीत कायदयाची अंमलबजावणी दिनांक ०५ ऑगस्ट, २०११ पासून महाराष्ट्रांत सुरु झालेली आहे.

सदर कायदयाचे कलम ३१ नुसार अन्न पदार्थ विक्री करणे, वितरण करणे, साठवणे इत्यादी करिता परवाना घेणे बंधनकारक केलेले आहे. ही कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत दि. ०४/०८/२०१2 पूर्वी करणे अपेक्षित असून सध्या कोणत्याही खाद्यपदार्थ विक्रीची सेवा विना परवाना होत असल्यास विषयांकीत कायदयाचे कलम ३१ नुसार गुन्हा घडतो व कलम ६३ नुसार शिक्षा होवू शकते.

याकरिता सर्व खाजगी क्षेत्रातील खाद्यपये विक्रेत्यांच्याबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या जिल्हास्तरीय कार्यालयाकडून कार्यवाही सुरु आहे.

याकरिता जर आपल्या अखत्यारितील राज्यातील कोणताही कार्यालयाच्या आवारात खाद्यपेय विक्री, जसे की कॅन्टीन इ. होत असेल किंवा आपल्या अखत्यारितील हॉस्टेल्स् उदा. शिक्षण विभागांतर्गत असलेले सर्व प्रकारचे विद्यापिठा अंतर्गत असलेली वसतीगृहे/कॅन्टीन्स् इ., आश्रमशाळा, अंगणवाडी, Mid day meal इ. तसेच शासकीय विभागांतर्गत असलेली महामंडळाकडील आस्थापनांमधील इमारतीतील खाद्यपेय विक्रेते (उदा. कॅन्टीन इ.)यांना अतितातकाळ अन्न परवाना/नोंदणी करण्याबाबत बंधनकारक करावे.याकरिता संबंधित जिल्ह्यातील अन्न सुरक्षा अधिकारी आणि पदनिर्देशित अधिकारी योग्य ती मदत करतील. (याकरिता सुरुवात म्हणून मुंबई आणि ठाणे जिल्ह्यामध्ये Online सुविधा www.foodlicensing.fssai.gov.in/UserLogin/Login.aspx वर सुध्दा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. )

आपला,

( महेश झगडे ) भा.प्र.से.
अन्न सुरक्षा आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन, म. राज्य.

प्रत, ---

१) सर्व मा. कुलगुरु.
२) सर्व विभागप्रमुख.
३) सर्व विभागीय आयुक्त.
४) सर्व महापालिका आयुक्त.
५) सर्व जिल्हाधिकारी.
६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

U96
8/6/12